Rotary
Club of Beed Midtown
# MIRROR
THE MAGIC OF ROTARY
अंक-७ | Club No. 27961 | RI Year 2024-25 | दि. ३० डिसेंबर २०२४

## रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन आयोजित अर्पण टी.आर.एफ. व इंटरनॅशनल सर्व्हिस सेमिनार यशस्वीरित्या संपन्न






रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या वतीने डिस्ट्रीक्ट टी.आर.एफ. आणि इंटरनॅशनल सर्व्हिस हा सेमिनार बीड या ठिकाणी घेण्यात आला. डिस्ट्रीक्ट ३१३२ मधील महाराष्ट्रातील विविध क्लब या सेमिनारमध्ये सहभागी झाले होते. डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. सुरेश साबु व रो.सी.ए. किशोरजी लुल्ला (आर्च क्लब सोसायटी मेंबर) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डिस्ट्रीक्ट ३१३२ मधील २२८ सभासदांनी या सेमिनारमध्ये रजिस्ट्रेशन केले होते. को.कन्वेनर म्हणून रो. उमाकांत थोरात व रो. सुर्यकांत महाजन, इंटरनॅशनल सर्व्हिस सेंटरचे को.कन्वेनर रो.सी.ए. आदेश नहार, रो.राहुल कुलकर्णी यांनी हा सेमिनार यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली. तसेच पी.डी.जी. रो.हरिष मोटवाणी यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले.

रो.डी.जी.डॉ. सुरेश साबु यांनी उद्घाटनपर भाषणात टी.आर.एफ. व इंटरनॅशनल सर्व्हिस या विषयी जगभरातील रोटरीची विस्तृत माहिती सांगितली. तसेच हा सेमिनार रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनने अतिशय उत्कृष्ट व दर्जेदार व्यवस्थापन केल्याबद्दल क्लबला पुढील काळासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून रो.सी.ए. किशोरजी लुल्ला यांनी सामाजिक, राष्ट्रीय दानाचे विविध उदाहरणे सर्व रोटरीयनना दिले. दान केल्यामुळे आपल्या स्वत:च्या संपत्तीमध्ये कशाप्रकारे वाढ होते याचे विविध उदाहरणे देऊन रोटरीयनच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. हा सेमिनार यशस्वी होण्यासाठी सर्व रोटरी सदस्यांनी मेहनत घेतली.


RI President :
Rtn. Stephanie Urichick


District Governor :
Rtn.Dr. Suresh Saboo


Assitant Governor :
Rtn. Ganesh Mule


President
Rtn.Er.Nitin Gopan


Secretary
Rtn.Dr.Nilesh Jagdale


Editor :
Rtn.Balaji Gharat

## जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स जनजागृती रॅलीमध्ये रोटरी क्लबने सहभाग घेऊन रॅलीतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप








जागतिक एड्स दिनानिमित्त सिव्हील हॉस्पिटल यांच्या वतीने एड्स जगजागृती रॅलीचे बीड शहरामध्ये आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये एड्स जनजागृतीबाबत मार्ग हक्काचा, सन्मानाचा! या घोषवाक्याच्या माध्यमातून एड्स ग्रस्त रुग्णांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच येणाऱ्या काळामध्ये या महाभयंकर आजारापासून कशाप्रकारे संरक्षण करता येईल याबाबत विविध घोषवाक्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

सिव्हील सर्जन डॉ. अशोक थोरात यांनी एड्स या आजाराविषयी महाराष्ट्रात काय परिस्थिती आहे याबाबत माहिती सांगितली. तसेच एड्स ग्रस्त रुग्णांबाबत समाजाने सहानुभूतीपर कशी वागणूक द्यावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच युवा पिढीने या आजाराबाबत संरक्षणासाठी कशी काळजी घ्यावी याची विविध उदाहरणे दिली. या रॅलीमध्ये रोटरी क्लब सहभागी झाल्याबद्दल व रॅलीतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या रॅलीत सर्व मेंबर सहभागी झाले होते.

।। महावीराय नमः ।।
राजेश बंब यांचे
जैन पत्रा & सिमेंट डेपो
नालीदार पत्रे, कलर कोटेड पत्रे, सिमेंट पत्रे, फायबर पत्रे,
सिमेंट, सनला, स्टिल, व पाईपचे होलसेल व रिटेल विक्रेते
Cell. 9225390000
9225380000
TATA SHAKTEE
पत्र्याचा कारखाना
TATA
पत्र्याचे शो-रुम
: पत्ता :
सावतामाळी चौक, मोंढा रोड, बीड-४३१ १२२

## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त रॅलीमध्ये सहभागी होऊन रोटरी क्लबने दिव्यांगांचे मनोबल वाढवले






जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यामध्ये दिव्यांगांच्या विविध समस्या व समाजातील गुणवत्ता या गोष्टींचा उहापोह करण्यात आला. तसेच बीड शहरामध्ये दिव्यांगाची रॅली काढून त्यांच्या आत्मसन्मानाबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे अध्यक्ष, सचिव तसेच सभासदांनी सहभाग नोंदविला.

## रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनची क्लब असेंब्ली असिस्टंट गव्हर्नर रो.गणेश मुळे यांच्या उपस्थितीत संपन्न






रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनची क्लब असेंब्ली असिस्टंट गव्हर्नर रो. गणेश मुळे, क्लब ट्रेनर रो. गणेश वाघ यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाली. क्लबमधल्या विविध जबाबदाऱ्या असणाऱ्या सर्व मेंबरशी रो. गणेश मुळे यांनी कामाचा आढावा घेतला. व सर्व जबाबदाऱ्या असणाऱ्या मेंबर्सनी अतिशय उत्कृष्ट व दर्जेदार काम या वर्षामध्ये केलेले आहे. डिस्ट्रीक्टच्या प्रत्येक मिटींगमध्ये रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे नाव चर्चेत राहते. तसेच अध्यक्ष व सचिव यांच्या व्यवस्थापनेबाबत डी.जी. रो.डॉ. सुरेश साबु हे सदैव समाधानी राहतात. मला विश्वास आहे की, येणाऱ्या काळामध्ये आपला क्लब एक नंबरला राहील असे मत रो. गणेश मुळे यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर सर्व मेंबर्सनी येणाऱ्या काळामध्ये आपल्यावर जी जबाबदारी आहे ती पूर्ण करून क्लबचे नाव डिस्ट्रीक्टमध्ये कसे उंचावेल यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी सर्व मेंबर बहुसंख्येने उपस्थित होते.

स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था...!
जिद्द | ज्ञान | सामर्थ्य ™
जिज्ञासा करिअर अकॅडमी, बीड
01 नागरी सेवा परीक्षा
02 राज्यसेवा परीक्षा
03 दुय्यम सेवा परीक्षा
04 गट-क सेवा परीक्षा
05 सरळसेवा परीक्षा
श्री.पारनेरकर महाराज मंदिर शेजारी, गोविंद नगर, माने कॉम्प्लेक्स ते नाट्यगृह रोड, बीड (02442) 221040, 8055221040

# रोटरी इन्स्टिट्यूटला पी.डी.जी.रो. हरिष मोटवाणी यांचा विशेष सहभाग









कोची या ठिकाणी रोटरी इन्स्टिट्युट सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. रोटरीच्या वेगवेगळ्या झोनमधून आंतरराष्ट्रीय लेवलवर कार्य करणारे विचारवंत यामध्ये सहभागी झाले होते. या सेमिनारमध्ये सहभागी होण्याचा व रोटरीमध्ये होणाऱ्या वेगवेगळ्या बदलाविषयी चर्चा करण्यासाठी आणि सामाजिक धोरणे आखण्यासाठी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे मेंबर पी.डी.जी. रो. हरिष मोटवाणी यांनी सहभाग नोंदवला. यावेळी डी.जी. रो.डॉ. सुरेश साबु यांची विशेष भेट त्या ठिकाणी संपन्न झाली. डिस्ट्रीक्ट ३१३२ मध्ये येणाऱ्या काळामध्ये नाविण्यपूर्ण व धोरणात्मक बदल घडवण्याचा आणि रोटरीला सर्वोच्च स्थानी नेण्यासाठी रो. पी.डी.जी. हरिष मोटवाणी यांनी संकल्प केला. या सेमिनारला सहभागी झाल्याबद्दल रोटरी क्लबमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण होते व सर्व सभासदांतर्फे त्यांना पुढील काळासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या व सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. याबाबत अध्यक्ष, सचिव यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## तिला संधी हवी...!

तिला हवी संधी फुलण्यासाठी
तिला हवा मायेचा हात घडण्यासाठी
थोडे आकाश हवे मोकळे
पंखांना हवे थोडे बळ, नभात उडण्यासाठी

स्त्री काय? अन् पुरुष काय?
दोघेही माणुसकीचा झरा खरे तर
स्त्रीच्या वाट्याला तरीही
कशामुळे आयुष्यभर मरमर?

स्त्री उत्तम संस्कारांची कलाकृती
ती बुद्धीमती, ती गुणवती, ती रुपमती
फक्त शरिरातील बदल म्हणजे नव्हे बाई
तिचे कर्तृत्व आकाशी झेप घेई

तुम्हा पुरुषांच्या हाती
वंशवेलाचा प्रखर दिवा
सर्वत्र त्याचा प्रकाश
वंश रुपाने चराचरात पसरावा

जनात तनमनात सर्वत्र
समानतेचा सुर गाऊ दे
सर्वत्र सर्व काळी सर्वांना
पणतीच्याही प्रकाशाचे महत्व कळू दे.

रचनाकार :
**रो.श्रीमती संगीता दामोदर सपकाळ (कदम)**



रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३२ परिवारासाठी अभिमानाचा क्षण रोटरी लिडरशिप काय असते एक उदाहरण रोटरी क्लब उमरगाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोटरी पास प्रेसिडेंट रो.प्रविण स्वामी यांची उमरगा लोहारा मतदार संघात आमदार म्हणून निवड

Mathemagic
Explore world of Maths
# MATHEMAGIC
By Dolly Jain

* CBSE, ICSE अभ्यासक्रम
* 3rd ते 5th सर्व विषय
* 6th ते 10th गणित
* होमवर्क व परीक्षांविषयी मार्गदर्शन

Follow our
YouTube Channel
*Mathemagic by Dolly Jain*

* कोटा(राजस्थान) येथील नामांकित संस्थांमध्ये शिकवण्याचा अनुभव.
* गणिताचा पाया पक्का करण्यासाठी विशेष लक्ष.

Mob. 8380876963

# येथे प्रत्येकजण माझा गुरू...!



चराचर सृष्टी सारी
येथेच जीवन होते सुरू,
प्रत्येकात नवे काहीतरी
येथे प्रत्येकजण माझा गुरू... ।।१।।
जन्मापासून आई-बाबाकडून
बाळकडू होताच सुरू,
शिक्षणाबरोबर संस्काराच्या शिंपनाने
समृद्ध जीवन होते सुरू... ।।२।।
शालेय जीवनातील शिदोरीने आयुष्याला
कलाटणी देतात गुरू,
पदोपदी समाजातील अनुभवाने
येथे प्रत्येकजण माझा गुरू... ।।३।।
चांगल्या वाईटाची सरमिसळ
कधी गोड, कध तिखट जरी,
जवळ दूरचे सारेच शिकविती
येथे प्रत्येकजण माझा गुरू... ।।४।।
जग रहाटीच्या रेलचेलीत
प्रत्येक ठोकर म्हणजे गुरू,
हवे ते घेऊ, नको ते सोडू
येथे प्रत्येकजण माझा गुरू... ।।५।।
कलियुगात या समजून
सारे आयुष्य सोपे आपण करू,
सान थोर सारेच सदैव होती
येथे प्रत्येकजणच माझा गुरू... ।।६।।

शब्दगुंफन :
**श्रीमती रो.उषा बप्पासाहेब ढेरे/करपे**
मुख्याध्यापिका
प्राथमिक शाळा ढेकणमोहा, बीड

## ।। श्रद्धांजली ।।



नटवरलाल बुद्धदेव यांच्या धर्मपत्नी

सौ.सरला नटवरलाल बुद्धदेव यांचे शनिवार दि. २१/१२/२०२४ रोजी दु:खद निधन झाले आहे. या दु:खद प्रसंगी सर्व रोटरी परिवार बुद्धदेव परिवाराच्या दु:खद घटनामध्ये सहभागी आहे. रोटरी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..!

## अभिनंदन..!



पद्मशाली प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने राज्यस्तरीय गौरव अधिकाऱ्याचा पुरस्कार डॉ.रो.प्रकाश कोंका यांना मिळाल्याबद्दल रोटरी परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन.!

## अभिनंदन..!



क्रांतीबा जोतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ रो.प्रा.डॉ.अनिता शिंदे यांना मिळाल्याबद्दल रोटरी परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन..!

## रोटरी क्लबतर्फे सर्व मेंबर्सना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो.बाबासाहेब कुडके- ५ जाने.
रो.शेख रब्बानी- ६ जाने.
रो.गणेश सोमाणी- ७ जाने.
रो.डॉ.सिताराम आळणे- ७ जाने.
रो.माणिक परभणे- १२ जाने.
रो.शुभम धुत- १६ जाने.
रो.प्रा.नितीन भोसले- २५ जाने.
रो.राजकुमार कुकडेजा- २८ जाने.

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲनेटस्‌ना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

कु.हर्षल सर्वज्ञ जोशी- ८ जाने.
स्वयम जयप्रकाश कुकडेजा-११जाने.
चि.आयुष संतोष पडुळे- १९ जाने.
मृणमयी मनोज थिगळे- २१ जाने.
मयुरी कैलास मैड- २३ जाने.
ओंकार नितीन भोसले- २५ जाने.
तेजश्री नितीन गोपन- २५ जाने.
राजश्री नितीन गोपन- २५ जाने.
पुजा राजकुमार कुकडेजा- ३१ जाने.

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲन्स यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

सौ.सुनंदा प्रल्हाद कराळे- १ जाने.
सौ. संगिता भारत बेद्रे- ४ जाने.
सौ.पद्मा संतोष टवाणी- ८ जाने.
सौ.ज्योती अनिल कुकडेजा-१५ जाने
सौ.सविता बाबासाहेब कुडके-१६ जाने.

## रोटरी क्लबतर्फे सर्व रोटरीयन व ॲन्स यांना लग्न वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो.गंगाबिशन करवा- २३ जाने.
रो.निर्मल जैन- २३ जाने.
रो. मनोज अग्रवाल- २५ जाने.
रो.संतोष टवाणी- २६ जाने.

## रोटरी परिवारातर्फे येणाऱ्या नूतन २०२५ नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

## नोव्हेंबर महिन्यातील १००% उपस्थिती

स्पॉन्सरशिप
**रो. दिनेश लोळगे**

रो.इंजि.नितीन गोपन
रो.डॉ.निलेश जगदाळे
रो.हरिष मोटवाणी
रो.भारत शेटे
रो.सुरेश बुद्धदेव
रो.जनार्दन दहिवाळ
रो.सर्वज्ञ जोशी
रो.बद्रिनारायण मानधने
रो.इंजि.अमोल तळेकर
रो.डॉ.सुरेंद्र बजाज
रो.डॉ.शिवाजी देशमाने
रो.इंजि.राहुल बोरा
रो.प्रल्हाद कराळे
रो.उमाकांत थोरात
रो.प्रा.राजेंद्र गाडेकर
रो.सीए.आदेश नहार
रो.संतोष टवाणी
रो.प्रा.नितीन भोसले
रो.बाबासाहेब कुडके
रो.बालाजी घरत
रो.अनिल कुकडेजा
रो. निर्मल जैन
रो.माणिक परभणे
रो.संतोष पडुळे
रो.उषा ढेरे



रो.प्रल्हाद कराळे यांचे जुळे टी.आर.एफ.च्या सेमिनारमध्ये ग्रेट भेट


स्टॉकिस्ट अँन्ड डिलर्स
*कारपेट *मॅटींग
*फोम *कुशन *क्वायर
*रेडीमेड पडदे
*रेक्झीन *बेड शिट्स
*गादी *वेलवेट
*फर्निशिंग *वॉलपेपर

सजावट
गृह सजावटीचे भव्य दालन
मुनोत कॉम्प्लेक्स, पुना गाडगीळच्या खाली,
सुभाष रोड, बीड - ४३१ १२२

रौप्य महोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण...
चंद्रप्रकाश सेठी
मो. 7588 85 85 85
9511 809 409